भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. ७६७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/११/२०१६

१) स्वत:चे आर्थीक लाभाकरीता प्रेस्ट्रीसाईज कंपनीच्या किटकनाशकांची अफरातफर केल्याने गुन्हा नोंद. :—

दिनांक १७/०८/२०१६ रोजी १५.३० ते १९/०८/२०१६ चे १४.०० वा. दर. यातील फिर्यादीच्या मुलाने केलेल्या ऑर्डर प्रमाणे जुपार्ट कंपनी व प्रेस्ट्रीसाईज कंपनीने ३ सीटी बिपीएल ट्रान्सपोर्ट कंपनीचे मालक प्रमोद मानिकराव अंबाटकर यांच्या ताब्यात दिले व त्यांनी आरोपी चालकाचे ताब्यात देवुन ट्रान्सपोर्ट कंपनीचे बिल्टी व कंपनीच्या डिहम प्रमाणे किटनाशनक पोहचऊन देण्यास दिले असता यातील आरोपी चालकाने स्वत:चे आर्थीक फायदया करीता प्रेस्ट्रीसाईज कंपनीच्या किटकनाशकाच्या बिल्टी डीएम मध्ये ज्युपार्ट कंपनीची १ बॉक्स किटनाशक १० किलो असे लिहीलेली अधीकची बिल्टी समाविष्ट करुन त्यावर नकळतपने दुकानात हजर नौकराची सही व सिक्का घेवुन कोरेजन किटकनाशकाची पेटी दुकानदाराचे ताब्यात दिल्याने व्ही. एफ. सी. बिपीएल ट्रान्सपोर्ट कंपनी डयुपांडया कंपनीचे असल्याचे भासवुन आरोपी चालकाने फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन १,७१,९००/—रु. ची कुरेजर किटक नाशक बॉक्सची अफरातफर केल्याने फिर्यादी क्रिष्णा बिसराम खेडीकर वय ८६ वर्ष, रा. गुजरी वार्ड लाखनी यांचे लेखी रिपोर्ट व चौकशी वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४०७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

२) ट्रक निष्काळजीपणामुळे एक जखमी . :—

दिनांक २२/११/२०१६ रोजी ०८.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे वाहनाला वैनगंगा नदीचे पुलावर येथे धडक देवुन अपघात केल्याने फिर्यादी राहुल केशव रामटेके वय ३२ वर्ष, रा. शनिवारी वार्ड पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९ भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करंण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

३) संगनमत करुन चलनातुन बाद झालेल्या नोटावर नोटा देण्याचे कबुल करुन आदेशाचे उल्लघंन केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २२/११/२०१६ रोजी १७.०० वा. दर. यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन रिझर्व बॅक आफ इंडीयाचे केन्द्रीय संचालक मंडळाने दि. ०९/११/२०१६ पासुन ५००/—रु. व १,०००/—रु. च्या चलनी नोटावर बंदी घातली असतांनी व ती दि. ०८/११/२०१६ चे भारतीय राजपत्रा मध्ये नोटीफीकेशन व्दारे प्रसारीत करुन त्यात बंदी घातलेल्या नोटांच्या अदल—बदल फक्त अधीकृत बॅक व्दारे होऊ शकेल असे निर्दश दिले असतांनाही यातील आरोपीतांनी संगनमत करुन सक्षम अधिका—याचे आदेशाचे उल्लघंन करुन ५०,०००/—रु. च्या चलनातुन बाद झालेल्या नोटावर ३५,०००/—रु. देण्याचे कबुल करुन सदरचे कृत्य केल्याने सरतर्फे फिर्यादी पोनी. कोलवाडकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८८,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. कोलवाडकर स्थागुशा भंडारा हे करीत आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.